Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

23 March 2019, Special Issue- 168 (I)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Co-Editor
Dr. Angad Gadme
Dept. of Sociology,PAH Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Prof. Anand Ghan
Dept. of Military Science, PAH Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

RESEARCH JOURNEY

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 Special Issue - 168 (I)
Globalisation: Challenges and Opportunities for India
March 2019
ISSN- 2348-7143
UGC Approved No. 40705

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**23rd March 2019 Special Issue- 168 (I)**

# Globalisation: Challenges and Opportunities for India

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Shivaji Dalnar**
**Principal**
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co- Editor of This Issue**
**Dr. Angad Gadme**
**Dept. of Sociology,**
PAH Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Prof. Anand Ghan**
**Dept. of Military Science,**
PAH Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | March 2019 | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (I) | UGC Approved No. 40705
Globalisation: Challenges and Opportunities for India

66
22. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम'
डॉ. एम. जी. भागानगरे
69
23. मानसिक आरोग्य आणि ताण व्यवस्थापन
प्रा. लोमटे सुषमा सुंदरराव
72
24. आयुर्वेदाचार्य राजीव दीक्षित यांचे विचार
डॉ. पाटील बाजीराव माणिकराव
७५
25. विद्यार्थ्यासाठी योग शिक्षणाचे महत्त्व
डॉ. डुमनर व्ही.एच.
78
26. आज की शिक्षा और मनौवैज्ञानिक क्षमता विकास
डॉ. विश्वनाथ भोजाजी रासवे
८०
27. जागतिकीकरण आणि मराठी भाषेसमोरील आव्हाने
डॉ. चव्हाण श्रीहरी दासू
८२
28. योग आणि मानसिक आरोग्य
डॉ.अनिल बन्सीधर वाघ
86
29. जागतिकीकरण व ज्ञानरचनावाद
डॉ.मोरे व्हि.पी., श्री.रामकिशन मुळे
88
30. ताण-तणाव व निरोगी जिवणासाठी प्राणायाम
प्रा. डॉ. भडके डि. डि.
90
31. इक्कीसवीं सदी की हिंदी कविता और नारी विमर्श
डॉ. लक्ष्मण तुळशीराम काळे
93
32. जागतिकीकरण आणि देशांतर्गत बदलती आव्हाने
प्रा. महेश चौरे
95
33. जागतिकीकरण आणि भारतीय स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग
डॉ.शारदा गोंविदराव बंडे
97
34. स्पर्धा आणि मानसिक आरोग्य
प्रा. डॉ. नलगे जी.पी.
35. आनंदी जीवनासाठी संगीत चिकीत्सा १००
मानसी सचिन सरदेशपांडे
36. जागतिकीकरण आणि भारताचे परराष्ट्र धोरण 102
प्रा. डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे
37. जागतिकीकरणाचे भारतीय समाजावरील परिणाम 104
प्रा.बळीराम वसंतराव पवार
38. जागतिकीकरण व भारतीय बँक सेवाक्षेत्र 106
प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे
39. जागतिक व्यापार संघटनेतील भारतीय कृषि आणि नागर संस्कृती 108
प्रा. डॉ. रामदिनेवार गोविंद शंकरराव
40. जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास 111
डॉ. सुखनंदन ढाले
41. जागतिकीकरण आणि दलित साहित्य 115
डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे
42. जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम 117
सहा. प्रा. डॉ.अल्का बा. सोमवंशी

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (I)
Globalisation: Challenges and Opportunities for India | March 2019 | UGC Appro No. 4070

# जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास

सुखनंदन ढाले
विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशाच्या एकुण लोकसंख्येपैकी 65 टक्के लोकसंख्या कृषीव्यवसायाशी निगडीत आहे. प्राचीन काळापासुन ते आजपर्यंत कृषीव्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय राहीला आहे.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातुन नियोजनबद्धपणे कृषीक्षेत्राच्या विकासाचे प्रयत्न झाले. परंतु वांरवार पडणारे दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती यामुळे अपेक्षित उदिष्ट गाठता आले नाही. असे असले तरी स्वातंत्र्यानंतरची दशके राष्ट्रीय उत्पन्नात कृषीक्षेत्राचा वाटा सर्वाधिक होता. यामुळे कृषीक्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते.
1968 नंतर भारतात हरितक्रांती झाली.हरितक्रांतीने कृषीउत्पादनात प्रचंड वाढ झाली. नवनवीन बी-बीयाणे, खते,कीटकनाशके याचा वापर वाढला. यामुळे कृषीउत्पादनात वाढ झाली.भारतात गहू आणि तांदूळ याचे विक्रमी उत्पादन होण्यास सुरुवात झाली.या प्रक्रियेने भारतात हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली.हरितक्रांतीनंतर नवनवीन बी-बीयाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा मोठया प्रमाणावर वापर वाढला. परिणामी उत्पादनात सातत्याने वाढ होत गेली परंतू त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही वाढ झाली.उत्पादन वाढले परंतू बाजारपेठेतील शेतमालाला मिळणारी किंमत स्थिर व अपुरी असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली नाही.

देशाची अन्नधान्याची गरज पुर्ण झाली.अन्नधान्याच्या बाबतीत राष्ट्र स्वंयपुर्ण झाले.महत्वाची गरज पुर्ण झाली परंतू त्यानंतरच्या काळात शेतीक्षेत्रात त्या प्रमाणात संशोधन झाले नाही.ज्वारी, तांदूळ, बाजरी, कापूस, गहू, कडधान्ये इत्यादी प्रमुख पिकाबाबत मुलभूत संशोधन झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत मोठया प्रमाणात वाढ झाली नाही. उत्पादन खर्च मात्र वेगाने वाढत गेला.प्रतिएकर मिळणारे उत्पादन, उत्पादन खर्च आणि हाती येणारे उत्पन्न याचा मेळ बसेनासा झाला.उत्पादन खर्च अधिक आणि कमी उत्पन्न या परस्परविरोधी समीकरणामुळे शेती किफायतशीर ठरण्याऐवजी तोट्याचा व्यवसाय ठरत आहे.या कृषी क्षेत्रातील व्यस्त समीकरणाचा मोठा फटकाअत्यल्पभूधारक, अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकऱ्यांना बसला.ग्रामीण भागातील वाढत्या लोकसंख्येमुळे कुटूंबात जमिनीचे विभाजन होवून जमीन धारणा सातत्याने कमी होतआहे. जमीनीचे क्षेत्रफळ प्रत्येक कुटूंबामध्ये कमी असल्याने उत्पन्न कमी व खर्च जास्त होत आहे. परिणामी या कुटूंबाच्या कुटूंब प्रमुखाला कर्ज घेतल्याशिवाय पर्याय राहत नाही.
1956 पासून आपल्या देशात कृषीविषयक धोरण आखण्यासाठी कायमचा कृषीमुल्य आयोग नेमला.गहू व भात वगळता इतर पिकांना न्याय मिळाला नाही. कोरडवाहू प्रदेशातून येणाऱ्या पिकांच्या आधारभूत किंमती वास्तव्याला धरुन नाहीत हे दूदैवी गोष्ट आहे हे कृषी मुल्य आयोगानेच म्हटले आहे. कापूस एकाधिकार योजनेचा फायदा झाला असला तरी त्यात प्रंचड त्रुटी होत्या. बाजारभाव, उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक सकंटात सापडला असा निष्कर्ष स्वामीनाथन आयोगाने काढला आहे.शेतीमधुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन मुलांचे शिक्षण, आजारपण, विवाह, दैनंदिन खर्च या कौटूबिक गरजा पूर्ण करणे शक्य होत नसल्याने उत्पन्नातील ही तुट भरुन काढण्यासाठी शेतकऱ्यांनासहकारी व राष्ट्रीयकृत बॅका, खाजगी सावकार यांच्याकडुन कर्ज घ्यावे लागते. हया कर्जाची परतफेड शेतीमधुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन न झाल्याने कर्जाचा डोंगर वाढला आहे. परिणामी शेतकरी कर्ज पुर्णपणे फिटू न शकल्याने, सावकार आणि बॅकांच्या भीतीने तसेच यामधुन निर्माण होणाऱ्या कौटूबिक समस्यांना वैतागुन आत्महत्येचा मार्ग स्विकारत आहे. भारतात 1990 या दशकाच्या मध्यापासून ते आजपर्यंत 2 लाख 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.या वैयक्तिक आत्महत्येचे मुख्य कारण कृषी क्षेत्रातील कर्जबाजारीपणा आणि शेतकऱ्यांवरील वाढते कर्ज असल्याचे दिसून येते. भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या 28 पैकी 5 घटकराज्यात सर्वाधिक आहेत. यांचा अर्थ या पाच राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्टया कमकूवत आहेत का? या प्रश्नाचे उत्तर जाणुन घेतल्यास हे लक्षात येते की, महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्यप्रदेश,कर्नाटक, तेलंगना या औद्योगिकदृष्टया विकसित राज्यामध्ये झाल्या आहेत.
महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा विकासाच्या दृष्टीने उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राच्या तुलनेत मागास आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे लोण आता विदर्भाच्या भौगोलिक सीमा ओलांडून मराठवाडा आणि खानदेशात जाऊन पोचले आहे. या आत्महत्या 1990 पासूनच्या भारतातील आर्थिक सुधारणाचा परिणाम आहेत. शेती व शेतकरी आत्महत्या ही एकूण समाजव्यवहारातील अतिशय गंभीर व चिंतनात्मक अशी घटना आहे. वरकरणी तो वैयक्तिक निर्णय आहे असे वाटले तरी प्रचलित सामाजिक,आर्थिक व्यवस्थेशी त्या घटनेचा संबंध आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सध्याचे सामाजिक सत्य आहे.
1991 मध्ये भारताने नवे आर्थिक धोरण जाहीर केले.त्यानुसार मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने कृषी, सेवा व उद्योग क्षेत्रावर त्याचा अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाला आहे.जागतिकीकरणाच्या काळात भारतात उद्योग व कृषीक्षेत्राच्या विकासापेक्षा सेवाक्षेत्राचाच अधिक विकास झाला आहे. राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा कमी होऊन तो 23 टक्के झाला आहे. इतर क्षेत्राचा वाटा वाढला आहे.भारतात कृषी क्षेत्राचा विकास दर 1 ते 2 टक्क्याच्या आसपास आहे. सेवा क्षेत्राचा विकास वृध्दीदर 8.9 टक्के आहे.यावरुन हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतीक्षेत्र उपेक्षित राहिले आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या तकलादू धोरणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. त्यातून भारतात मोठया प्रमाणात शेतकरी आत्महत्या होत आहेत.
भारत हा कृषीप्रधान देश आहे.परंतू भारतामधील शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्याने भारतातील शेतकरी व शेती समस्या प्राचीन काळापासून ते आजपर्यंत सुटलेल्या नाहीत.शेतकऱ्यांची दयनीय अवस्था राहिलेली आहे.स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षामध्ये भारतामधील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीत विशेष फरक पडलेला नाही.हरीतक्रांतीनंतर कृषी उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. याचबरोबर उत्पादन खर्चातही वाढ झाली.शेतमालाचे अधिक उत्पादन होउनही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले नाही. उत्पन्नापेक्षा उत्पादन खर्च अधिक झाल्याने शेती व्यवस्था उध्वस्त झाली. शेतकरी दिवसेंदिवस दयनीय बनली आहे.1991 मध्ये भारत सरकारने नवे आर्थिक धोरण जाहीर केले.या नव्या धोरणानुसार शेती व्यवस्था वाटचाल करत आहे. शेतीची कारणे म्हणजे कर्जबाजारी होणे असे समीकरण रुजले आहे. कर्जबाजारीपणमुळे शेतकरी कर्जबाजारी होउन आत्महत्येकडे सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. याला महाराष्ट्रातील शेतकरी ही अपवाद नाहीत.महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा या विभागामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेल्या

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

आहेत. महाराष्ट्रामध्ये 2001 ते 2016 या काळात एकुण 24,315 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.विदर्भापासून सुरु झालेल्या आत्महत्येचे सत्र मराठवाडयातही पोहचले आहे. मराठवाडा हा विकासाच्या दृष्टीने उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा विशेषतः पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राच्या तुलनेत मागास म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेत शेती उत्पन्नाची टक्केवारी 45.26 इतकी आहे. ती इतर सर्व प्रदेशांपेक्षा जास्त आहे. दर हेक्टरी अल्प शेती उत्पन्न व शेती उत्पन्नाचे एकूण राष्ट्रिय उत्पन्नातील मोठे प्रमाण ही दोन्ही लक्षणे मागास अर्थव्यवस्थेचे लक्षणे आहेत.कृषीप्रधान अर्थव्यवस्था अशी ओळख असणाऱ्या राष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या होणे ही गंभीर अशी समस्या आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सखोल अध्ययन करुन ही समस्या सोडविणे गरजेचे आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्ट्ये**

प्रस्तुत विषयावर संशोधन करीत असतांना खालील उद्देश निश्चित करुन संशोधन कार्य पुर्ण केले होते.

1) शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या व प्रश्न जाणून घेणे.
2) शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांचा अभ्यास करणे.
3) शेतीविषयक आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांविषयीच्या शासकीय धोरणाचा अभ्यास करणे.
4) शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासकीय धोरणाचा आढावा घेणे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यामागे अनेक कारणे**

भारतात एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे ही जगातील एकमेव घटना आहे. प्रत्येक प्राणीमात्रामध्ये जगण्याची दुर्दम्य इच्छा असते. तरीही विचारी व परिपक्व वयात स्वत:चा अंत घडवून आणणे ही गोष्ट सहजासहजी घडत नाही. एक समान कारणासाठी इतक्या मोठया प्रमाणात आत्महत्या होतात या मागे निश्चितच काही गोठे गुढ आहे. त्यामुळे ही शृंखला घडत आहे. आत्महत्या हे कृत्य सहज नसून त्याच्या पाठीमागे प्रचंड अशी निराशा आणि वैफल्यग्रस्तता आहे. शेतकऱ्यांच्या वेदना सहनशीलतेच्या पलीकडच्या असल्यामुळेच आत्महत्या घडत आहेत. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रात सततच्या अपयशाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करत आहे. शेतीव्यवसायात निर्माण झालेली दुष्टचक्रे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असली तरी त्याला सामाजिक, आर्थिक, वैयक्तिक व राजकीय पैलू कारणीभूत आहेत. हे सर्व घटक वेगवेगळया परिस्थितीत शेतकऱ्यांना आत्महत्यांपर्यंत पोहचवत आहेत. हे पैलू स्वतंत्रपणे कारणीभूत आहेत हे स्पष्ट दाखविणे अवघड आहे. एवढी त्यांची एकमेकांत गुंतागुत आहे. त्यामुळे फक्त राजकीय कारणांचे वर्गीकरण न करता शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असणारी विविध कारणे अभ्यासणे गरजेचे आहे.

**1) शासनाचे व्यापारी व भांडवलदारधार्जीने आर्थिक धोरण**

1991 मध्ये भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले. त्यानंतर पाच वर्षांनी म्हणजे 1995 नंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना सुरुवात झाली. नव्या आर्थिक धोरणानुसार भारतात जागतिकीकरण व उदारीकरणाला सुरूवात झाली. या काळात कृषी क्षेत्राची पीछेहाट झाली. नवीन आर्थिक धोरणांमुळे आयात निर्यात धोरणात बदल झाला. एका बाजूने कृषी खर्चात वाढ झाली तर दुसऱ्या बाजूने कृषी मालाच्या किंमती घसरल्या. एकूणच शेतीमालांच्या बाजार भावापेक्षा उत्पादन खर्चात वाढ झाली. शेती व्यवसाय तोटयाचा झाला. कृषी क्षेत्रातील गुतवणूक झपाटयाने कमी झाली. आर्थिक संस्थापासून होणारा कर्जपुरवठा कमी झाल्याने शेतीच्या विकासाची गती खुंटली.

**2)बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता प्रभाव**

1991 च्या नव्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय कृषी क्षेत्रात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रवेश केला आहे. पारंपारिक बी-बीयाण्यांचे संवर्धन करणारा व कमी खर्चात पारंपारिक शेणखत वापरुन नफ्यात राहणारा शेतकरी जास्त उत्पन्न देणाऱ्या संकरीत वाणाकडे वळला. जास्त उत्पन्नाच्या मागे लागून तोटयाची शेती करु लागला. 'मॉन्सेटो' व 'सेन्झेन्टा' या बहुराष्ट्रीय कंपन्यानी शेतकऱ्यांची पारंपारिक आत्मनिर्भरता संपवून बी-बीयाणांच्या क्षेत्रात आपली मक्तेदारी प्रस्थापित केली. या कंपन्यांचे एकच उगवण क्षमता असणारे बियाणे जास्त किमतीत शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षी घ्यावे लागतात. या कंपन्यांची महागडी बियाणे निरुपयोगी ठरल्याचा फटका शेतकऱ्यांना बसला. बहुराष्ट्रीय कंपन्यानी जैव तंत्रज्ञानाचे जुनकीय बदल केलेल्या या बियाणांना रासायनिक खत मोठया प्रमाणात लागतात. या बियाणात कीड व रोग प्रतिकारक क्षमता कमी असल्याने मोठया प्रमाणावर औषधे फवारावी लागतात. किटकनाशकांच्या किंमती प्रचंड असल्याने त्याचा उत्पादन खर्चावर परिणाम झाला. या खर्चासाठी शेतकऱ्याला खाजगी सावकाराकडून कर्ज काढावे लागले. त्यातून शेतकरी कर्जबाजारी झाला व आत्महत्याकडे वळला आहे.

**2) बँकांचे कृषी पत पुरवठयाबावत उदासीन धोरण**

राज्यकर्त्यांनी शेती पतपुरवठयाबाबत उदासीनता दिसून येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यानंतर 6 टक्के व्याजदराने कर्ज देण्याची घोषणा केली गेली. परंतु अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नाही. शेतकरी झटपट कर्जासाठी अडचणीच्या काळात खासगी सावकाराच्या जाळयात अडकला. यातून होणाऱ्या प्रचंड कर्जातून सुटका करुन घेण्यासाठी तो आत्महत्या करु लागला.

**4) खासगी सावकारी कर्ज**

महाराष्ट्रातील बहुतांशी शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे झाल्या. शेतकऱ्यांकडील कर्ज सहकारी बँका, भू-विकास बँका यांच्याकडून घेतलेले होते. आत्महत्या केलेले शेतकरी हे सीमांत व अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्यामुळे त्यांना राष्ट्रीयीकृत बँकानी कर्ज देणे शक्य नव्हते, असे असले तरी ते प्रमाण नगण्य आहे. सहकार व भूविकास बँकाच्या वसुलीच्या मोहिमांच्या अपमानास्पद वागणुकीला कंटाळून शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या काळातच आत्महत्या केल्या आहेत.

**5) कृषी अनुदान कपातीचे धोरण**

डंकेल प्रस्तावाच्या मसुदयानुसार विकसित देशांनी 20 टक्के तर विकसनशील देशांनी 13.33 टक्के प्रमाणे शेती अनुदानांत कपात करावी असे बंधन आहे. विकसित देशांनी अगोदरच आपल्या शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात अनुदान दिले होते. भारत सरकारने मुळातच कमी असणाऱ्या अनुदानात 1991 नंतर कपात करण्यास सुरुवात केली. विकसित देश प्रचंड प्रमाणात अप्रत्यक्ष अनुदान देत असताना सततच्या संकटामुळे मेटाकुटीला आलेल्या भारतीय शेतकऱ्याला अप्रत्यक्ष मिळणारे अनुदान कमी करुन राज्यकर्ते शेतकऱ्यांनी आणखी आत्महत्या कराव्यात असेच ध

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (I)
Globalisation: Challenges and Opportunities for India
ISSN- 2348-7143
March 2019
UGC Approved No. 40705

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

### आयात-निर्यात धोरण

...विरोधी ...ने केला प्रस्ताव स्वीकारला. त्यामुळे गरज असो अथवा नसो जागतिक व्यापाराच्या 2 टक्के आयात करणे बंधनकारक आहे. भारतात ...आयातीत 400 टक्के वाढ झाली. भारतात येणाऱ्या कृषी मालांवर 150 ते 300 टक्के पर्यंत आयात कर लावता येणे WTO च्या ...शक्य आहे. त्यामुळे विकसित देशांतील स्वस्त येणाऱ्या मालांशी भारतीय शेतकरी स्पर्धा करु शकेल. परंतु भांडवलदार दलाल व ...दबावामुळे राज्यकर्ते येणाऱ्या मालांवर साखरेवर 60 टक्के तर कापसावर 10 टक्के आयात कर लावत आहेत. त्यामुळे भांडवलदार ...शेतीय माल मोठ्या प्रमाणात आयात करतात. त्यामुळे स्थानिक बाजारात शेतीमालांचे भाव घसरुन शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे.

### ...सिंचनातील अन्याय तफावत

...तील जलसिंचन क्षेत्राचे पीकांखालील क्षेत्राशी असणारे प्रमाण 15 ते 16.40 टक्के इतके आहे. इतर राज्यांशी तुलना करता हे प्रमाण अल्प ...पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाडयाची तुलना केल्यास प्रचंड तफावत आढळून येते. हा जलसिंचन क्षेत्राचा अनुशेष शेती आणि ...साठी भयंकर ठरत आहे. पुणे व नाशिक विभागात जलसिंचन सुविधांचे प्रमाण अनुक्रमे 23 टक्के व 15 टक्के आहे. शेतकऱ्यांच्या मोठ्या ...आत्महत्या अमरावती व औरंगाबाद विभागात झाल्या आहेत. जलसिंचन सुविधांचे हे प्रमाण अनुक्रमे 5.6 टक्के व 11.25 टक्के इतके आहे. ...जलसिंचन क्षेत्रातील तफावत लक्षात येते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर एका भागाचा विकास झाला तर दुसरा अंत्यत मागसलेला राहिला हे ...कारक आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त भाग हा संपूर्णपणे कोरडवाहू आहे. शेतकरी आत्महत्याचे हे एक महत्वाचे कारण ठरत आहे.

### ...पीकपध्दती

...सुविधांचा विचार करता पर्जन्यमान अगदीच कमी आहे असे नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या विभागात असलेली पारंपरिक एक ...पध्दतीसुध्दा शेतकऱ्यांना मारक ठरली आहे. ज्या भागात दुबार पीक पध्दती आहे त्या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण अतिशय कमी

### ...पूस पिकाचा दुष्परिणाम

...पूस महत्वाचे पीक असणाऱ्या राज्यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा दर अधिक आहे. महाराष्ट्रातसुध्दा कापूस पट्टयातच प्रामुख्याने ...त्यांचे प्रमाण जास्त आहे. एकूण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी 55 टक्के आत्महत्या या भागात झाल्या आहेत.

### ...दोष विपणन व्यवस्था

...ऱ्यांच्या आत्महत्यांना सदोष पणन व्यवस्था हा एक महत्वाचा घटक कारणीभूत ठरला आहे. विपणन व्यवस्थेत शेतकऱ्यांना कसलेही स्थान उरले ...कृषी उत्पन्न बाजार समितीवर शेतकऱ्यांचे प्रतिनिधी निवडले जातात हा निव्वळ राजकीय सोपस्कार ठरला आहे.

### ...शेतीमालांचे कमी भाव

...राज्य सरकारने शेती मालांचे जे हमी भाव जाहीर केले त्यात सुसूत्रता नाही. गेल्या दोन वर्षात 2007 पासून केंद्र शासनाने कापसाच्या हमी भावात ...वाढ केली नाही. अमंलबजावणीची सुयोग्य यंत्रणा नसल्यामुळे सर्वत्र शासकीय भावाने शेतीमालांची विक्री होताना दिसत नाही.

### ...र्ष

...स्थानिक बाजारात शेतकऱ्यांकडून शेतीमालाची केली जाणारी विक्री हे त्यांच्या शोषणाचे केंद्र आहे आणि दारीद्रयाचे मुळ कारण आहे.

...बाजारपेठेत शेतकऱ्याला शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आणि व्यापारी वर्गाच्या शोषण नीतीमुळे उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळत नाही.

...शेतीमधून मिळणारे उत्पन्न व उत्पादनामधून वार्षिक, कौटूंबिक खर्च भागत नसल्याने त्याच्याकडे कर्ज काढण्याशिवाय कोणताही पर्याय नाही.मजूरी व इतर कामधंदा करुन किंवा जमीनीची विक्री करुन आपला खर्च पुर्ण करतात.ग्रामीण भागात मजुरीचे दर अत्यल्प असतात व समाधानकारक... मजुरी मिळत नाही.

...शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नामधून कुटूंबाचा खर्च भागत नाही.त्यामुळे मजुरी करुन किंवा कर्जकाढून कुटूंबाचा दैनंदिन खर्च भागविण्याचे प्रमाण जास्त आहे.

...धार्मीक, रुढी, परंपरा यांचे पालन करण्याची प्रवृत्ती शेतकरी कुटूंबात कमी होत चालली आहे.

...रासायणिक खते व बियाणे याचा वापर 54.16 टक्के शेतकरी स्व-अनुभव व कृषी केंद्रावरील विक्रेते यांच्या सल्याने करतात.

### ...सूचना

...आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाना इंदिरा आवास योजना, सिचन विहीर, गायी - म्हशी, शेळीपालन, कुकुटपालन,शेडनेट हाउस, मिनी दाळमिल, ...गांडूळवाटिका, फळबाग लागवड, ट्रॅक्टर व अवजारे इ. शासकीय योजनांचा लाभ दयावा.

...60 वर्षावरील शेतकऱ्यांना6 हजार मासिक पेन्शन देण्यात यावे.

...आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबातील मुलामुलींना पदवीपर्यत शिक्षणमोफत देण्यात यावे.

...आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नीला10 हजार निराधार मासिक वेतन देण्यात यावे.

...शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगासाठी व व्यवसायासाठी लागणारे भागभांडवल बॅकाव्दारे शेतकऱ्यांना विनाअट देण्यात यावे.

...शेतकऱ्यांना रासायणिक खते व बि-बियाणे यावर 50 टक्के पेक्षा जास्त सबसिडी दिली जावी.

...सरकारचे आयात-निर्यात धोरण शेतकरी केंद्रीत असावे. उदा. शेतमालाचे देशांर्गत उत्पादनजेव्हा अधिक होते तेव्हा सरकारद्वारे निर्यात बंद केली जाते.

### ...ष्कर्ष

...भारतातील एकुण लोक संख्येपैकी 65 टक्के लोकसंख्या कृषी व कृषीपुरक व्यवसायाशी निगडीत आहे. प्राचीन काळापासुन ते आजपर्यंत ...व्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय राहिला आहे. आजही सर्वाधिक रोजगार निर्मीती, निर्यातीतील महत्वपुर्ण स्थान,अन्नधान्याची आत्मनिर्भरता, ...कच्चा मालाचा स्त्रोत इ. महत्वपुर्ण भुमिका भारतीय अर्थव्यवस्थेत राहिली आहे. परंतु 1991 नंतर भारतातील कृषीक्षेत्राविषयी सरकार, बँका, ...

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

PRINCIPAL
Shivaji College